# “जागतिक महिला दिन” साजरा

कै. कु. दुर्गा क. बनमेरू विज्ञान महाविद्यालय, लोणार जि. बुलढाणा येथे ०८ मार्च २०२२ मंगळवार रोजी “जागतिक महिला दिन” साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनावतीने रासेयो, कार्यक्रमधिकारी डॉ. सुर्यकांत बोरूळ, यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश क. बनमेरू यांच्या मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश क. बनमेरू यांनी तर प्रमुख वक्त्या लोणार शहरातील नामवंत डॉक्टर, साहित्यिक, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. मीना सोसे मॅडम तसेच नारीशक्तीचा सन्मान गौरव करण्यासाठी लोणार पोलीस स्टेशन मधील महिला पोलीस कर्मचारी उपस्थितीत होत्या.

कार्यक्रमाची सुरवात महान-नारी शक्तींच्या प्रतीमा पूजनाने व मान्यवरांच्या स्वागताने करण्यात आली. यांनतर कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. सुर्यकांत बोरूळ यांनी “जागतिक महिला दिन” साजरा करण्याचा उद्देश आपल्या प्रास्ताविकामधून विद्यार्थ्यासमोर स्पष्ट केला व कार्यक्रमाची रूपरेषा मांडली. यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थींनी कु. सिद्धी बनमेरू, कु. वैष्णवी डव्हळे व कु. रेणुका भुक्कन यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या मा. डॉ. मीना सोसे मॅडम यांनी “स्त्रीची विविध क्षेत्रातील बदलती भूमिका” या विषयावर आपले विचार मांडले या मध्ये त्यांनी मासाहेब जिजाऊ, मुक्ताबाई, सावित्रीबाई फुले, इत्यादी नारीशक्तींचे उदाहरण देऊन स्त्री हि सृजनशील तसेच शक्तिशाली आहे हे स्पष्ट केले. स्त्री ने मिळालेल्या ह्या संधीचे सोने करावे असे मत व्यक्त केले.

यानंतर लोणार पोलीस स्टेशन मधील महिला पोलीस कर्मचारी पोलीस कॉन्स्टेबल मा.सविता राठोड, मा. सीमा उन्हाळे, मा.राधा देवकर, मा.बबिता अंभोरे, मा. ज्योती कटारे, मा.अलका बजाड यांचा “जागतिक महिला दिन” निमित्त त्या पारपाडत असलेल्या कौटुंबिक, सामाजिक, व कार्यरत क्षेत्रातील उलेखनीय कामगिरीबद्दल पुष्पगुच्छ, भेटवस्तू व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. महिला पोलीस कर्मचारी मा. बबिता अंभोरे यांनी स्त्री हि अबला नसून सबला आहे व स्वसंरक्षण कसे करावे हे संगितले.

आपल्या अध्यक्षीय भाषणातून मा. प्राचार्य डॉ. प्रकाश क. बनमेरू यांनी “जागतिक महिला दिन” निमित्त राष्ट्रपती सन्मान प्राप्त महिलांचा उलेख केला त्यामध्ये महाविद्यालयात येऊन विद्यार्थ्यांना सर्प माहिती देणाऱ्या सर्पमित्र मा. वनिता बोराडे, हिवरा आश्रम जिल्हा बुलडाणा

यांना नारीशक्ती सन्मान मिळाला हे सांगितले. तसेच आताच आपल्या देशाला मिळालेल्या क्रीडा क्षेत्रातील पाच सुवर्ण पदकामध्ये तीन सुवर्ण पदके हे महिलांनी मिळविलेले आहे अशी विविध उदाहरने देऊन स्त्री आता प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहे हे स्पष्ट केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाच्या विद्यार्थांनी कु. कल्याणी घुगे, कु. रेणुका भूक्कन तर आभार प्रदर्शन रासेयो कार्यक्रमधिकारी प्रा. डॉ. सुर्यकांत बोरूळ यांनी केले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवक, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### ❖ जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रमाचे क्षणचित्रे -




**व्यासपीठावरील मान्यवर व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करतांना विद्यार्थिनी**




**नारीशात्तींच्या प्रतिमेचे पूजन करतांना मान्यवर व्यासपीठावरील मान्यवर**




कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या डॉ. मीना सोसे मॅडम मार्गदर्शन करतांना




कार्यक्रमाचे अध्यक्ष, प्राचार्य डॉ. प्रकाश बनमेरू अध्यक्षीय भाषणकरतांना




महिला पोलीस कर्मचारी मा.बाबती अंभोरे मॅडम यांचा पुष्पगुच्छ, भेटवस्तू व सन्मानपत्र देऊन गौरव करतांना मान्यवर




महिला पोलीस कर्मचारी मा.ज्योती कटारे मॅडम यांचा पुष्पगुच्छ, भेटवस्तू व सन्मानपत्र देऊन गौरव करतांना मान्यवर




कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना डॉ. सुर्यकांत बोरूळ व आपले मनोगत व्यक्त करतांना विद्यार्थिनी

| | |
|---|---|
| डॉ.सुर्यकांत बोरूळ | डॉ.प्रकाश बनमेरू |
| **रासेयो कार्यक्रमधिकारी** | **प्राचार्य** |